सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मातं), निर्णय क्र. HPC-2026/C.R.27/IT, दि. २७/०२/२०२६.

**विषय** :- माहिती तंत्रज्ञानविषयक धोरण व प्रकल्प राबविण्यासाठी उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन करणे, तसेच समितीची कार्यकक्षा व खर्चास मान्यता देण्याची वित्तीय मर्यादा निश्चित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्र. HPC-2026/C.R.27/IT, दि. २७/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२२७१५१५५११२०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-03-2026 12:39:45

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**माहिती तंत्रज्ञानविषयक धोरण व प्रकल्प राबविण्यासाठी उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन करणे, तसेच समितीची कार्यकक्षा व खर्चास मान्यता देण्याची वित्तीय मर्यादा निश्चित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग (मातं)**

**शासन निर्णय क्रमांक : HPC-2026/C.R.27/IT**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २७ फेब्रुवारी, २०२६

**वाचा:**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सीओएम-१०९८/प्र.क्र. २१२/९८/३९, दि. ०५.१०.२००१
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सीओएम-१०९८/प्र.क्र. २१२/९८/३९, दि. ०५.१०.२००२
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सीओएम-१०९८/प्र.क्र. २१२/९८/३९, दि. ०५.११.२००२
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सीओएम-१०९८/प्र.क्र. २१२/९८/३९, दि. ०५.०८.२००५
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९, दि. २३.०९.२०११

**प्रस्तावना:**

शासन निर्णय दि. ०५.१०.२००१ अन्वये माहिती तंत्रज्ञान विषयक धोरण प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या माध्यमातून शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमध्ये संगणकीकरण व माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, तसेच संबंधित धोरणात्मक व आर्थिक निर्णय घेणे अपेक्षित आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. २३ सप्टेंबर, २०११ अन्वये महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण स्वीकारण्यात आले असून, या धोरणानुसार शासनाच्या सर्व सेवा माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामान्य जनतेस पारदर्शक, प्रभावी व जलदगतीने उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार विभागस्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) व उच्चाधिकार समिती यांची माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्पांना मान्यता देण्यासंबंधी आर्थिक कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. त्यामधील तरतुदीनुसार दहा लक्ष रुपयांपेक्षा जास्त आणि रुपये पाच कोटी पेक्षा कमीच्या माहिती तंत्रज्ञानविषयक सर्व प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समितीने आणि पाच कोटी रुपयांवरील सर्व प्रस्ताव उच्चाधिकार समितीने तपासून मंजूर करणे आवश्यक आहे.

तथापि, उच्चाधिकार समितीची विद्यमान कार्यकक्षा निश्चित करण्यात येऊन सुमारे २५ वर्षांचा कालावधी लोटला असून, ई-प्रशासन धोरण अंमलात येऊन देखील जवळपास १५ वर्षे झाली आहेत. या कालावधीत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले असून, वाढती महागाई, रुपयाचे अवमूल्यन, तांत्रिक प्रगती, सायबर सुरक्षा, ऑनलाईन

सेवा वितरण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच ई-गव्हर्नन्स प्रकल्पांचा वाढलेली व्याप्ती व खर्च यांमुळे माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्पांची किंमत व स्वरूप लक्षणीयरीत्या बदललेले आहे.

या पार्श्वभूमीवर, विद्यमान उच्चाधिकार समितीची रचना, कार्यकक्षा तसेच आर्थिक मान्यतेच्या मर्यादा सध्याच्या परिस्थितीशी सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचे प्रभावी नियोजन, अंमलबजावणी, समन्वय व संनियंत्रण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन करणे, समितीची कार्यकक्षा नव्याने निश्चित करणे तसेच सुधारित आर्थिक मर्यादा ठरविणे आवश्यक झाले आहे. त्यानुषंगाने उच्चाधिकार समितीची सुधारित रचना, कार्यकक्षा व माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्प खर्चास मान्यता देणेबाबत वित्तीय मर्यादा निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्प खर्चास मान्यता देण्यासाठी उच्चाधिकार समितीची सुधारित रचना, कार्यकक्षा व वित्तीय मर्यादा पुढीलप्रमाणे नव्याने निश्चित करण्यात येत आहे.

**उच्चाधिकार समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल:-**

| अ. क्र. | समितीचा तपशील | |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त) | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन) | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल) | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास) | सदस्य |
| ६. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नगर विकास-१) | सदस्य |
| ७. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नगर विकास-२) | सदस्य |
| ८. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (प्र. ना. उ. व सु.) | सदस्य |
| ९. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग) | सदस्य |
| १०. | State Informatics officer (SIO), एनआयसी, मुंबई. | सदस्य |
| ११. | संचालक, माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई. | सदस्य |
| १२. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई | सदस्य |
| १३. | ज्या विभागाचा माहिती तंत्रज्ञाविषयक प्रस्ताव आहे त्या विभागाचे विभागप्रमुख | सदस्य |
| १४. | तज्ञ समितीचे सदस्य (गरजेनुसार) | सदस्य |
| १५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती तंत्रज्ञान) | सदस्य-सचिव |

**उच्चाधिकार समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असेल:-**

I) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात होणा-या प्रगतीचा आढावा घेऊन शासनाचे माहिती तंत्रज्ञान धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळास सल्ला देणे.

II) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नव्याने येणारी उत्पादने, सॉफ्टवेअर्स, माहिती तंत्रज्ञान सेवा याविषयी आढावा घेणे व शासनाच्या कामकाजात त्याचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन करणे.

III) माहिती तंत्रज्ञान विषयक शासनाने हाती घेतलेल्या विविध ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा नियतकालिक आढावा घेणे तसेच त्याबाबत शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमध्ये समन्वय साधणे व सनियंत्रण करणे.

IV) संगणकीकरण प्रकल्प, माहिती व तंत्रज्ञान विषयक प्रकल्प, ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान विषयक वस्तू व सेवा, तांत्रिक मनुष्यबळ नेमणे (Appointment/ Reappointment/ Extension of IT Consultants services) तसेच आवश्यक संसाधनाच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने रुपये पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त आणि रुपये शंभर कोटी पेक्षा कमीच्या माहिती तंत्रज्ञान विषयक खर्चाच्या सर्व बाबींना/प्रकल्पांना मान्यता देणे.

V) माहिती तंत्रज्ञान विषयी केंद्र शासनाच्या विविध प्रकल्प व योजनांचा आढावा घेऊन त्याबाबत सनियंत्रण, समन्वयन करणे तसेच आवश्यक निर्देश देणे.

VI) केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञान विषयी लागू केलेले विविध कायदे, नियम यांची राज्यस्तरावरील अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

VII) प्रकल्प राबवितांना एखाद्या बाबतीत विभागीय अंमलबजावणी समितीत एकमत न झाल्यास त्याबाबतचा निर्णय घेणे.

२. माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्प खर्चास मान्यता देणेबाबत वित्तीय मर्यादा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:

१) प्रशासकीय विभागस्तरावर गठीत प्रकल्प अंमलबाजवणी समिती :- रु.दहा लक्ष पेक्षा जास्त ते रु. पाच कोटीपर्यंत.

२) मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती :- रु. पाच कोटीपेक्षा जास्त ते रु. शंभर कोटीपर्यंत.

३) रु. शंभर कोटीपेक्षा जास्त रकमेच्या माहिती तंत्रज्ञानविषयक खर्चाचे सर्व प्रस्ताव प्रथम उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत. उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनंतर सदर प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाची मान्यता आवश्यक राहील.

३. संबंधित प्रशासकीय विभागाने रु. शंभर कोटीपेक्षा जास्त रक्कमेच्या मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाच्या टिप्पणीमध्ये सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०२५ अन्वये मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या सुचनांनुसार दायित्वाचा समावेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन पुरकपत्र दिनांक २६.११.२०२५ मधील सुचनांनुसार "विकसित महाराष्ट्र-२०४७ व्हिजन डॉक्युमेंट्स" बाबत समावेश करून प्रस्ताव तयार करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०२२७१५१५५११२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.02.27 15:17:28 +05'30'

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
११) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१४) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९) सर्व पोलीस आयुक्त,
२०) सर्व विभागीय आयुक्त,
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२७) संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई,
२८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२९) सर्व मंत्रालयीन विभाग,
३०) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई,
३१) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३) निवडनस्ती/मातं.